<u>निधी वितरण सन २०२५-२०२६</u>

**आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी २२१०जी४४९ (General) या लेखाशिर्षाखाली ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) निधी वितरित करून सदर योजनेसाठीच्या राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या एस्क्रो खात्यावर जमा करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः मफुयो -२०२५/ई-१०७९७४५/MJPJAY&AB-PMJAY**

गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, १० मजला,
मंत्रालय, एल.टी. मार्ग, मुंबई
दिनांक: ३१ जुलै , २०२५.

<u>वाचा -</u>

१) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. रास्वयो २०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६ दि.२१.९.२०१८
२) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.रास्वयो२०१८/प्र.क्र.७८/आरोग्य -६ दि.२६.२.२०१९
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दिनांक २८ जुलै, २०२३
४) शासनपत्र क्रमांक मफुयो-२०२४/प्र.क्र.१९१/आरोग्य-६ दि. १०.९.२०२४
५) मा मंत्रीमंडळ सचिव यांचे पृष्ठांकन दि.१०.३.२०२५ (दि.६.३.२०२५ च्या मंत्रीमंडळ बैठकीचे कार्यवृत्त)
६) राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई यांचे पत्र क्रमांक: राआहसो/लेखा/काअ/११६४८/ ५७९/२०२४-२५, दि. २.०४.२०२५
७) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०७.०४.२०२५
८) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. मफुयो-२०२५/ E- १०७६४९७/ MJPJAY&AB-PMJAY दि. १७ जुलै,२०२५
९) शासन निर्णय क्रमांक प्रजयो-२०२५/ई-११३८६२३/ MJPJAY&AB-PMJAY दि. १७ जुलै,२०२५

<u>प्रस्तावना</u> :-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दिनांक २८.७.२०२३ च्या शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनेची विस्तारित स्वरूपात अंमलबजावणी सुरू असून राज्य शासनाच्या वतीने राज्य आरोग्य हमी सोसायटीद्वारे राज्य आरोग्य हमी सोसायटीतर्फे अंगीकृत रूग्णालयांचे उपचारांचे दावे थेट रूग्णालयांना अदा केले जातात. सदर योजना दिनांक ०१.०७.२०२४ पासून पूर्णतः हमी तत्वावर (Assurance Mode) राबविण्यात येत असून उपरोक्त संदर्भ क्र ८ येथील दि.१७ जुलै २०२५ च्या शासन निर्णयातील प्रशासकीय मान्यतेच्या आदेशात नमूद केलेल्या दराने शुल्क आकारून अंमलबजावणी सहाय्य संस्थांमार्फत योजनेची

अंमलबजावणी केली जात आहे. अ.क्र.६ येथील दि.२.४.२०२५ राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे १)आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लेखाशीर्ष २२१० जी ४४९ (राज्य हिस्सा ४० टक्के) अंतर्गत रु.६,९९,००,३६६/- आणि २)महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लेखाशीर्ष २२१० जी २५१ (सर्वसाधारण) अंतर्गत रु.३५,१५,१४,१९१/- असे एकूण रु.४२,१४,१४,५५७/- इतके अंमलबजावणी सहाय्य संस्थांचे शुल्क प्रलंबित आहे. हे शुल्क अदा करण्यासाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीस निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत निधी वितरणाबाबत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येत असून सन २०२५-२०२६ मध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लेखाशीर्ष २२१० जी ४४९ (राज्य हिस्सा ४० टक्के) अंतर्गत अंमबजावणी सहाय्य संस्थांचे प्रलंबित सेवा शुल्क अदा करण्याबाबतचा शासन निर्णय पुढीलप्रमाणे आहे-

## शासन निर्णय-

आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या २२१०जी४४९ (सर्वसाधारण) ३१- अनुदाने याखाली सन २०२५-२०२६ साठी रू. १५०.०० कोटी तरतूद अर्थसंकल्पित असून केंद्र पुरस्कृत योजनांचा १०० टक्के निधी, वित्त विभागाच्या दि. ७.४.२०२५ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय विभागांस वितरित केला आहे. सदर १५०.०० कोटी तरतुदीपैकी रू. ८०,३५,८१,६८१/- कोटी तरतूद योजनेअंतर्गत अंगीकृत रूग्णालयांचे दावे अदा करण्यासाठी अ.क्र.९ येथील शासन निर्णय दि.१७.७.२०२५ अन्वये वितरित करण्यात आली आहे. रू. ६९,६४,१८,३१९/-एवढी तरतूद वितरणासाठी उपलब्ध आहे. या उपलब्ध तरतुदीतून, आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना पूर्णतः हमी तत्वावर राबविण्याकरिता (Assurance Mode) राज्य आरोग्य हमी सोसायटीद्वारे नियुक्त केलेल्या तीन अंमलबजावणी सहाय्य संस्थांचे प्रलंबित सेवा शुल्क अदा करण्यासाठी रू. रु.६,९९,००,३६६/-(सहा कोटी नव्व्याण्णव लक्ष तीनशे सहासष्ठ) एवढा सशर्त निधी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या ESCROW खात्यावर तात्काळ वर्ग करण्यासाठी नियंत्रक अधिकाऱ्यांकडे सुपुर्द करण्यात येत आहे. सदर रकमेचा धनादेश राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या नावे काढण्यात यावा.

२. सदर अनुदानाचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तसेच सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी असतील.

३. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७ एप्रिल, २०२५ सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अटी व शर्तीची पूर्तता होत आहे.

४. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात खालील लेखाशिर्षाखाली मंजूर झालेल्या तरतुदीच्या मर्यादेत खर्च करण्यात यावा.

**मागणी क्र. आर-१**

| | | |
|---|---|---|
| २२१० | - | वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य |
| ०१ | - | नागरी आरोग्य सेवा- विषमचिकित्सा |
| ११० | - | रुग्णालये व दवाखाने, |
| ०७ | - | आयुष्यमान भारत कार्यक्रम |
| ०७) (०२) | - | प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (कार्यक्रम) (राज्य हिस्सा ४० टक्के)<br>२२१० जी ४४९, ३१- सहायक अनुदाने वेतनेतर |

५. सदरील खर्च हा सशर्त असून केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व योजनेच्या प्रगतीचा अहवाल राज्य शासनास विहित प्रपत्रात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वेळोवेळी पाठविण्यात यावा. तसेच सदरील निधी हा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात यावा. आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी केंद्र हिश्श्याचा निधीची मागणी राज्य आरोग्य हमी सोसायटीने विहित मुदतीत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाकडे करावी.

६. सदर शासन निर्णय, ई-आफिसद्वारे Comp No 1079745 वर अनुक्रमे नियोजन विभागाने Note #36 व वित्त विभागाने Note #51 वर निधी वितरणासाठी दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०७३११२३००१४३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEELAM GIRISH SANGWAI

Digitally signed by NEELAM GIRISH SANGWAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=a9bbc429d62201a67249f70e60acdfadbff901fbbbf45cc393dbd6aa91fbd6ca, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=81e4e52421d72a2ae32df6c7d06abb4e6a7b5820c3a929f328ad6c0dca4f38c7, cn=NEELAM GIRISH SANGWAI
Date: 2025.08.01 15:56:09 +05'30'

**(नीलम संगवई)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई.
६. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
७. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.

८. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. (३प्रती)

९. नियोजन विभाग (कार्यासन१४७२), मंत्रालय, मुंबई.

१०.वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.

११.अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२.निवड नस्ती.